**<u>ठळक बातम्या</u>**

- पुण्यात विषारी दारू प्यायल्याने मृत्यूमुखी पडलेल्यांचा आकडा १२ वर, आतापर्यंत ८ जणांना जणांना अटक
- विधानपरिषदेच्या १७ पैकी १५ जागांवर महाविकास आघाडीत सहमती
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये सुमारे अकराशे अंकांची घसरण

**आणि**

- यंदाच्या मान्सूनमधे सरासरीच्या ९० टक्के पावसाचा अंदाज

<><><><><>

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्यामुळे आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये ७ जणांचा मृत्यू झाला असून दापोडी, फुगेवाडी, काळे पडळ आणि हडपसर परिसरातही ५ जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी आतापर्यंत ८ जणांना अटक केली असून पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस वेगानं तपास करत आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मुख्य आरोपी योगेश वानखेडे यालाही अटक केली आहे. त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रशासनाला दिले आहेत.

<><><><><>

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीकरता महाविकास आघाडीचं १५ जागांवर एकमत झालं आहे. त्यानुसार काँग्रेस ८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ४, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३ जागा लढवणार आहे. याबाबत आज मुंबईत महाविकास आघाडीच्या नेत्यांची झाल्यानंतर

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. उर्वरित दोन जागांवरही लवकरच निर्णय होईल, असं त्यांनी सांगितलं. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे उपस्थित होते.

चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड, तसंच पोटनिवडणूक असणाऱ्या नागपूर मतदारसंघात काँग्रेस उमेदवार देणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष- पुणे, ठाणे, आणि सांगली-सातारा या ३ जागा, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष- रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, आणि छत्रपती संभाजीनगर या ४ जागा लढवत आहे, असं सपकाळ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नीट परीक्षेसारख्या प्रकरणात जबाबदारी निश्चित केली पाहिजे असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. नीटचे पेपर फुटल्यानंतर दाखल झालेल्या याचिकासमूहावर न्यायमूर्ती पी एस नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठासमोर सुनावणी सुरु झाली. नीट परीक्षेबाबत वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेण्याकरता वेगळी मजबूत आणि स्वायत्त यंत्रणा तयार करावी किंवा सध्याच्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेमधे आमूलाग्र बदल करावा, अशी मागणी यातल्या एका याचिकेत केली आहे. येत्या २१ जून रोजी फेरपरीक्षा होणार असून त्यावेळी काही गैरप्रकार होऊ नयेत याकरता विशेष उपाययोजना केल्या आहेत, प्रधानमंत्री स्वतः या प्रक्रीयेवर लक्ष ठेवून असल्याचं महाअधिवक्ता तुषार महेता यांनी सांगितलं. मात्र जबाबदारी निश्चित करणारा आणि अशा परीक्षांच्या प्रक्रीयेत सुधारणा करण्याबाबत सविस्तर जबाब दाखल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारच्या मनुष्यबळविकास मंत्रालयाला दिले.

<><><><><>

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं, नीट-यूजी परीक्षेसाठीचा शुल्क परतावा मिळण्याकरता बँक खात्याचे तपशील सादर करण्याची अंतिम मुदत २२ जूनपर्यंत वाढवली आहे. आधी ही मुदत २६ मे पर्यंत होती. मात्र, नोंदणी केलेल्या २३ लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ १३ लाख विद्यार्थीच त्या मुदतीत तपशील सादर करू शकले होते.

त्या अनुषंगानं ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप तपशील सादर केले नाहीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करणं सुलभ व्हावं या उद्देशानं ही मुदतवाढ दिल्याचं एनटीएनं स्पष्ट केलं.

<><><><><>

राज्यात इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठीची पहिली यादी आज जाहीर झाली. राज्यातल्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाकडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या प्रवेशासाठी राज्यभरातून १२ लाख ५१ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ९२ अकांची घसरण झाली आणि तो ७४ हजार ७७६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३५९ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ५४८ अंकावर बंद झाला.

<><><><><>

यंदा जून ते सप्टेंबरच्या कालावधीत होणारा मोसमी पाऊस सरासरीच्या ९० टक्केच पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. नवी दिल्लीत आज मान्सून हंगाम २०२६च्या दुसऱ्या टप्प्यातील दीर्घकालीन हवामान अंदाजाविषयी विभागाचे संचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी माध्यमांना माहिती

दिली. एल निनो परिस्थितीमुळे देशात यंदाचा नैऋत्य मान्सून दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. या हंगामात भारतातल्या पावसाच्या स्थितीबद्दल ते यावेळी म्हणाले...

**होल्ड... बाईट - मृत्युंजय मोहपात्रा**

येत्या जून महिन्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि गुजरातच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी १ लाख ७४ हजार क्विंटलचा राष्ट्रीय बियाणे साठा स्थापन करण्यात आल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत खरीप हंगाम २०२६साठी आयोजित राष्ट्रीय कृषी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी माध्यमांशी बोलत होते. देशाचे एकूण अन्नधान्य उत्पादन अंदाजे ३७ कोटी ६० लाख टनांपेक्षा जास्त झालं असून, ते आतापर्यंतचं सर्वाधिक उत्पादन आहे, अशी माहिती चौहान यांनी दिली. आतापर्यंत ९ लाख ७६ हजार शेतकरी ओळखपत्रं तयार करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना आता विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी वेगळ्या कागदपत्रांची गरज भासणार नाही, असं चौहान म्हणाले. खत वितरणात पारदर्शकता, काळाबाजार रोखणे आणि खऱ्या शेतकऱ्यांना योग्य पुरवठा सुनिश्चित करण्याची गरज असल्याचं चौहान म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त नवी दिल्लीत 'तंबाखू-मुक्त शैक्षणिक संस्था-ToFEI' या ॲपच्या प्रायोगिक आवृत्तीचं उद्घाटन आज केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलीला श्रीवास्तव यांच्या हस्ते झालं. देशभरातल्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये तंबाखुसंबंधित नियमांची अंमलबजावणी आणि देखरेख

सुनिश्चित करणं हा या डिजिटल ॲपचा उद्देश आहे. यामुळे शैक्षणिक संस्थांना स्वयं-मूल्यांकन आणि अहवाल सादर करणे, तंबाखूसंबंधित मार्गदर्शक तत्त्वांचे पालन तपासणे, तंबाखू नियंत्रणाच्या सूचना फलकांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि शैक्षणिक संस्थांच्या शंभर यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी घालण्यास मदत होईल.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात अन्न आणि औषध प्रशासन विभागाने ५ ठिकाणी छापे टाकून १ लाख १९ हजार रुपयांचा संशयित अन्नसाठा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. त्याचा अहवाल प्राप्त होताच संबंधित विक्रेते, पुरवठादार यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

<><><><><>

पेट्रोल, डिझेल, गॅस सिलेंडरची दरवाढ आणि टंचाई विरोधात काँग्रेस पक्षाने राज्यात अनेक ठिकाणी आंदोलने केलं.

**नागपूर इथं** काँग्रेस कार्यकर्त्यांनी हातात दुचाकी उचलून आंदोलन केलं. संविधान चौकातून निघाला मोर्चा आकाशवाणी चौकात रोखण्यात पोलिसांना यश आलं. **नाशिक शहर काँग्रेसने** त्र्यंबकनाका इथे जन आक्रोश आंदोलन केले. तसंच युवक काँग्रेसच्या वतीने पंपांवर पेट्रोल आणि डिझेल भरणाऱ्या ग्राहकांना मेलोडी चॉकलेट वाटले. सर्वसामान्यांना भाव वाढीपासून दिलासा मिळावा याकरिता पेट्रोल डिझेल, गॅस सिलिंडरची दरवाढ तत्काळ मागे घ्यावी, अशी मागणी या सर्व आंदोलनांतून करण्यात आली.

**बीड जिल्ह्यात** आंदोलकांनी जिल्ह्याधिकाऱ्यांना निवेदन दिलं. सध्या शेतीच्या मशागतीचे दिवस सुरू असून पेट्रोल, डिझेल टंचाई आणि दरवाढीमुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होत असल्याचं निवेदनात म्हटलं आहे.

**नांदेड शहर** आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आयटीआय येथील महात्मा फुले पुतळ्यासमोर आंदोलन केले. आंदोलकांनी बैलगाडीवर स्कुटी आणली आणि रस्त्यावरच चूल मांडून भाकरी थापत आंदोलन केले. **धुळे जिल्ह्यात** काँग्रेसने घोडागाडीवर सिलेंडर आणि पेट्रोल, डिझेलच्या कॅन घेवून घोषणाबाजी केली.

**<><><><><>**

पुण्यात खडकवासला इथल्या एनडीए, अर्थात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १५० व्या अभ्यासक्रमाचा दीक्षांत समारंभ दिमाखदार वातावरणात पार पडला. पुद्दुचेरीच्या माजी नायब राज्यपाल तथा निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. किरण बेदी या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या होत्या.

यावेळी २३६ कॅडेट्सना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विज्ञान शाखेचे ६५, संगणक विज्ञान शाखेचे ११२, आणि कला शाखेचे ५९ कॅडेट्स समाविष्ट आहेत. तसंच मित्र राष्ट्रांमधल्या २१ कॅडेट्सनाही पदवी बहाल करण्यात आली. उद्या होणाऱ्या एनडीएच्या दीक्षांत संचलनाचं निरीक्षण सैन्य दल प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी करणार आहेत.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत, पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात, आज, गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामना रंगणार आहे. चंडीगढ मधे महाराजा यादविन्द्र सिंह मैदानावर थोड्याच वेळात सामन्याला सुरुवात होईल. राजस्थाननं या सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने गुजरात टायटन्स संघाचा पराभव केला होता.

**//<><><><><>//**